संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# हे हल्ले मतांचे किंवा मनोरंजनाचे विषय नाहीत

**पुलवामा** हल्ल्याचा किंवा त्यानंतर भारताने केलेल्या प्रतिहल्ल्याचा राजकारणासाठी वापर करू नये असे विरोधी पक्षांचेच काय सामान्य जनतेचेही म्हणणे आहे. आता तर लोकसभा निवडणूक तोंडावर असल्यामुळे राजकारण करू नये असे वारंवार सांगून या हल्ल्याचा किंवा प्रतिहल्ल्याचा निवडणुकीसाठी वापर करण्याचे तंत्र सत्ताधारी आणि विरोधक दोन्ही करताना दिसून येतील. म्हणजे थोडक्यात आपल्या राजकीय स्वार्थाकरीता लष्कराचाही वापर होऊ नये. अशी या राजकीय पक्षांकडून सर्वसाधारण अपेक्षा आहे. परंतु या हल्ल्याचा किंवा प्रतिहल्ल्याचा राजकीय वापर होऊ नये असे वाटत असतानाच तसाच त्याचा मनोरंजनासाठीसुध्दा वापर होता कामा नये. हा हल्ला होऊन धड महिनाही झाला नाही त्याआधीच चित्रपट निर्मात्यांनी पुलवामा हल्ला आणि त्यानंतरच्या सगळ्या घटनांवर आधारित चित्रपट निर्माण करण्याकरीता गर्दी केली आहे. चित्रपटाचे नाव निश्चित करण्याकरीता सेन्सॉर बोर्डाकडे जवळपास दहा चित्रपट निर्मात्यांचे अर्जही दाखल झाल्याचे सांगितले जाते. याचा अर्थ देशाच्या भवितव्याशी निगडीत अतिशय गंभीर असा हा विषय मनोरंजन किंवा चित्रपटासाठी वापरला जाऊ नये. ज्यामध्ये चाळीसपेक्षा जास्त जवानांचे प्राण गेले. किंवा ज्या हल्ल्यामुळे संपूर्ण देशामध्ये संतापाची लाट निर्माण झाली होती. असे लोकांच्या आणि एकूणच देशाच्या दृष्टीने राष्ट्रीय भावना व्यक्त करणारे हे विषय चित्रपटांच्या धांगडधिंग्याचे किंवा स्वतःचा गल्ला भरून घेण्यासाठी वापरले जाऊ नयेत यात काही शंका नाही. अशा विषयांना देशभक्तीच्या भावनेची जोड दिली जाते. आणि त्याचा व्यावसायिक उपयोग करण्याचा हा प्रकार योग्य ठरत नाही. त्यातही भारत पाकिस्तान या दोन देशांतील संबंध हे नेहमीच तणावग्रस्त राहिल्याने त्यासंदर्भातल्या विषयांना मनोरंजनाची फोडणी देऊन आपले हित साधून घेण्याचा प्रयत्न केला जातो. प्रत्यक्षात या चित्रपटांमधून फारसे काही साध्य होत नाही.. उलट या दोन देशांमधील तणाव कायम ठेवण्याचेच काम नकळतपणे होत राहाते. अलीकडच्या पाकिस्तानकडून भारताच्या उरी या लष्करी तळावर झालेल्या हल्ल्यावरही चित्रपट तयार झाला. आणि निर्मात्याने गडगंज कमाई केली. म्हणजेच ज्या हल्ल्यात वीस जवानांचे बळी गेले होते. ज्यातून भारत पाक संबंध आणखी ताणले गेले होते. तो विषय चित्रपटासाठी वापरून अशा हल्ल्यांचेही व्यापारीकरण होत असेल तर ते थांबवले गेले पाहिजे.

### अन्य देशांची उदाहरणे पहा

गेल्या काही वर्षात अशा प्रामुख्याने भारत पाक संबंधांवरचे किंवा दहशतवाद या विषयांवरचे बरेच चित्रपट प्रदर्शित झाले. एलओसी कारगिल, गाझी अॅटॅक, लक्ष्य, अय्यारी, उरी द सर्जिकल स्ट्राईक, राजी, बॉर्डर अशा चित्रपटांची रेलचेल झाली होती. आता त्याच शृंखलेमध्ये पुलवामा हल्ला किंवा प्रतिहल्ला हा विषय घेऊन चित्रपट काढण्यासाठी निर्मात्यांमध्ये स्पर्धा सुरु होणे याचा अर्थच या गरमागरम विषयावर आपल्या व्यवसायाच्या पोळ्या भाजून घेण्याचा अट्टाहास दिसून येतो. म्हणजे राजकारणी करतात तोच प्रकार चित्रपट निर्मातेही करतात. राजकारण्यांना हे विषय मतांसाठी हवे आहेत तर निर्मात्यांना ते मनोरंजनासाठी वापरायचे आहेत. दोघांचाही या अतिशय गंभीर विषयाकडे बघण्याचा दृष्टीकोन किती सवंग आणि थिल्लर स्वरुपाचा आहे हे स्पष्ट होते. कोणत्याही देशाचा अभिमान सन्मान, प्रतिष्ठा ही सशक्त आणि तटस्थ लष्करावर अवलंबून असते. जगातल्या कोणत्याही मोठ्या विकसित देशांमध्ये लष्कराचा अशा पध्दतीने वापर होऊ दिला जात नाही. परिणामी राष्ट्रीय भावनेचे किंवा अभिमानाचे विषय जपले जातात. त्याचा कोणाकडूनही आणि कशाही पध्दतीने गैरवापर होणार नाही याची दक्षता घेतली जाते. जगातला सर्वात भीषण दहशतवादी हल्ला म्हणून अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवरचा हल्ला मानला जातो. परंतु या विषयावर अमेरिकेत काय जगाच्या कुठल्याच भागात चित्रपट निघाला नाही. अमेरिकेने लादेनसारख्या क्रूरकर्म्याला असाच धडाकेबाज सर्जिकल स्ट्राईक करून काढलेला होता. त्यावर देखील चित्रपट निघालेले नाहीत. अशी अनेक उदाहरणे देता येतील. की सर्व प्रमुख राष्ट्रे आपले लष्कर किंवा आपल्या देशाच्या सुरक्षिततेशी निगडीत विषय कोणाच्याही प्रदर्शनाचे विषय होणार नाहीत किंवा त्याचा मनोरंजन अथवा व्यापारी कारणांसाठी वापर होणार नाही. याची ते दक्षता घेत असतात.

### प्रत्येकाने भान ठेवा

ही उदाहरणे जर डोळ्यासमोर ठेवली तर पुलवामा हल्ला काय किंवा भारताने बालकोटा तळावर केलेला प्रतिहल्ला काय या गोष्टी मतांच्या आणि मनोरंजनाच्या होता कामा नये. राजकीय पक्षांनी स्वतःची बुध्दी शाबूत ठेवून किंवा देशाची सुरक्षितता आणि लष्कराचे महत्त्व लक्षात घेऊन या हल्ल्यांचा वापर करू नये किंवा आम्ही जोखमीचे निर्णय घेऊन पाकिस्तानला ठिकाणावर आणण्यासाठी कसे निर्णय घेतले हे सांगण्याची फुशारकी मारू नये. त्या ठिकाणी कोणत्याही पक्षाचे सरकार असते तरी त्यासाठी ती त्याची जबाबदारी ठरली असती. कर्तव्य म्हणून लष्कर जर आपले काम चोख बजावत असेल तर राजकीय पक्षांनीदेखील आपल्या जबाबदारीचे भान ठेवून राजकीय सभांमध्ये त्याचा किंवा लष्कराचा वारंवार उल्लेख होईल अशी भाषणे करण्याचे कारण नाही. लोकांनी पुलवामा हल्ला किंवा त्याला दिले गेलेले प्रत्युत्तर प्रत्यक्ष अनुभवले आहे. भारतीय लष्कराने दाखवलेल्या धाडसाचा प्रत्येकाला अभिमान वाटतो आहे. सरकारने यासाठी घेतलेला पुढाकारही लोकांपर्यंत पोहोचलेला आहे. आता त्याचा राजकीय वापर होता कामा नये. जसा राजकीय वापर होऊ नये तसाच तो मनोरंजनाचा विषय होता कामा नये. सरकारने याच काय परंतु यापुढे भारत पाक संबंधांवरच्या अथवा देशाच्या सुरक्षिततेशी निगडीत विषयांवरच्या चित्रपटांना किंबहुना नाटक, टीव्ही मालिकांना परवानगी देऊ नये हे विषय मनोरंजनाचे नाहीत किंवा अशा थिल्लर स्वरुपात जनजागृती करण्याचेही नाहीत.